# नाशिक महानगरपालिका नाशिक
## मध्यवर्ती भांडार विभाग
## कोटेशन नोटीस २०१७

नाशिक महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागणारे रबरी शिक्के तयार करुन पुरविणेसाठी अनुभवी पुरवठादारांकडुन कोटेशन मागविण्यत येत आहे .

| अ.क्र | माल वर्णन | संख्या | एकुण खर्च |
|---|---|---|---|
| १ | गोल रबरी शिक्का (भेद चिन्ह ) शिक्क्याचा किमान व्यास २७ सेमी | १५०० नग | १,२०,०००/- |
| २ | बाण फ़ुलीचा शिक्का (दोन्ही बाजुस रबरी बाण फ़ुलीचे चिन्ह ) | १५०० नग | ५२,५००/- |
| | एकुण | | १,७२,५००/- |

अटि / शर्ती

१) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटिशर्तीसह www.nashikcorporation.gov.in) या संकेत स्थळावर दि. १३/०१/२०१७ ते दि. २०/०१/२०१७ या कालावधीत उपलब्ध आहे

२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दि. २१/०१ /२०१७ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील .

३) सदरचे साहित्य पुरविणेबाबतचे कोटेशनचा लिफ़ाफ़ा मध्यवर्ती भांडार विभाग , राजीव गांधी भवन , शरणपुररोड , नाशिक येथे विहित मुदतीत पोहच करावे . मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही .

४) सदरचे दरपत्रकात सर्व करासह व वाहतुक खर्चासह बसविणेचे मंजुरीसह दर नमुद करावयाचे आहेत . कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही .

५) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निन्मस्वाक्षरीकार यांचा राहील

Sd/-

**उप.आयुक्त (स्था.सं.क) तथा**
**खाते प्रमुख म.भांडार विभाग**
**नाशिक महानगरपालिका नाशिक**

नाशिक महानगरपालिका , नाशिक

मध्यवर्ती भांडार विभाग

कोटेशन पत्रक २०१७

कामाचे नाव ;- नाशिक महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागणारे रबरी शिक्के तयार करुन पुरविणे बाबत

कोटेशनधारकाचे नाव ;- ---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत ;- दि २१/०१/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत
कामाची मुदत ;- २ महिने

नाशिक महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागणारे रबरी शिक्के तयार करुन पुरविणे बाबत

| अ.क्र | तपशिल | दर सर्व करासह | प्रमाण / एकक |
|---|---|---|---|
| १ | गोल रबरी शिक्का (भेद चिन्ह )<br>शिक्क्याचा किमान व्यास २७ सेमी<br>शिक्क्यास चांगल्या दर्जाची मुठ व बैठक बसविणे | | |
| २ | बाण फ़ुलीचा शिक्का<br>(दोन्ही बाजुस रबरी बाण फ़ुलीचे चिन्ह )<br>शिक्क्यास चांगल्या दर्जाची मुठ व बैठक बसविणे | | |

सदर कोटेशनसोबतच्या असलेल्या सर्व अटि शर्ती मी / आम्ही वाचल्या असुन मला / आम्हाला त्या मान्य आहेत . सदर अटि शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये केलेल्या दराने उक्त स्टेशनरी व इतर साहित्याचा पुरवठा करण्यास मी / आम्ही तयार आहे . त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे.

कोटेशनधारकाची सही व शिक्का

## नाशिक महानगरपालिका , नाशिक
## मध्यवर्ती भांडार विभाग
## सर्व साधारण अटी शर्ती (कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे .

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे / काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल . तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र रु १२०/- चे जनरल स्टॅम्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल . तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल .

५) सेल्स **टॅक्स**, वाहतुक खर्च व इतर सर्व करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही **टॅक्स**ची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र. रु १ याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील

८) एकुण बिलाच्या रक्कमेतुन कामाचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनुसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल.मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास अथवा प्रयोजनाचा हेतु पुर्ण झाल्यानंतर मागणीनुसार सदरची रक्कम परत करण्यात येईल

९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास / मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल / काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

१०)मंजुर नमुन्याप्रमाणे / स्पेशिफ़िकेशनप्रमाने मालावर पुरवठा न झाल्यास /काम न झाल्यास माल परत करण्यात येईल/ अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

११)कोणताही माल मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही . याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही .

१२) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील .

१३) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात / कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पसे मिळणार नाही .

१४) पुरवठाधारकाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

Sd/-
उपआयुक्त तथा
खाते प्रमुख म.भांडार विभाग
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास / सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे . त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का